## रे.दि.मु. नं.८९/२०१३ मध्ये नि. क्र. २० खालील आदेश

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचेविरूध्द दावेचे काम विनाकैफियत चालावे असा झालेला आदेश रद्दबातल होवून अर्जासोबत दिलेली कैफियत कामी सामील करून घ्यावी याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीतर्फे म्हणणे प्रस्तुत अर्जावरच दाखल केले आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ यांनी असे कथन केले आहे की,त्यांना व त्यांचे वकीलांना दि. २८/१०/२०१३ रोजी नेमल्या तारखेबाबत गैरसमज झाल्याने ते त्यादिवशी कामी हजर राहून अर्ज देवू शकले नाहीत. त्यामुळे त्यादिवशी दाव्याचे काम विनाकैफियत चालावे असा आदेश पारीत झाला आहे. सदरकामी प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत देणेस ८० दिवसांचा विलंब झाला आहे. तथापि वादी व प्रतिवादी यांचेमधील बहिण-भावाचे नाते असल्याने वादीशी आपसांत तडजोड होते काय याच्या प्रयत्नात प्रस्तुत प्रतिवादी होता. तसेच दाव्याबाबतची महत्त्वाची कागदपत्रेही त्याला उपलब्ध झाली नव्हती. त्यामुळे मुदतीत कैफियत देता आली नाही. दावेकामी प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत दाखल करून घेणे जरूरीचे आहे. कैफियत कामी सामील झाली नाही तर प्रस्तुत प्रतिवादीस त्याचे न्याय हक्कांपासून वंचित रहावे लागणार असून त्याचे कशानेही भरून न येणार नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

३. वादीने अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज मंजूरीस विरोध दर्शविलेला आहे. वादीने असे कथन केले आहे की, ८० दिवसांच्या उशीराबाबतचे योग्य व समर्पक कारण दिले नसल्याने अर्ज नामंजूर करावा. यदाकदाचित अर्ज मंजूर केला तर रक्कम रू. ३०००/- खर्च म्हणून प्रस्तुत प्रतिवादीकडून वसूल होवून मिळावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आलेली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा सरस-निरस मानाने वाटप होवून कब्जा मिळणेकरिता दाखल करण्यात आलेला आहे. स्थावर मिळकतीमधील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. अद्याप उर्वरित प्रतिवादींना समन्स बजावणी होणेची आहे. त्यामुळे दाव्याचेकाम चौकशीपुर्व स्थितीमध्ये आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता दावा गुणदोषावर निकाली

करणेकरिता प्रतिवादीस म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायाचे व गरजेचे आहे. अर्जात नमुद केलेली कारणे संयुक्तिक आहेत. तथापि त्याचवेळी दावेचेकामी झालेल्या विलंबाबत वादीस प्रतिवादींकडून खर्चाची रक्कम मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील झालेला विलंब लक्षात घेता प्रतिवादींनी वादीस खर्चापोटी रक्कम रू. १००/– मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी वादीस खर्चापोटी रक्कम रू. १००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रस्तुत प्रतिवादी विरूध्द दि. २८/१०/२०१३ रोजी दावेचे काम विनाकैफियत चालावे असा झालेला हुकूम रद्दबातल करण्यात येते आहे.
३. प्रस्तुत अर्जासोबत प्रस्तुत प्रतिवादींनी दाखल केलेली कैफियत अभिलेखावर स्विकारण्यास परवानगी देण्यात येत आहे.
४. अनुषंगिक आदेश दावा अर्ज नि.क्र. १ वर पारीत करण्यात येत आहे.

स्थळः– माढा. **(एकनाथ को.चौगले )**
दिनांकः– २०/०६/२०१६ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, माढा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Oder/Judgment is same word to word, as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Jadhav A.A. |
| Court Name | : | 2nd Jt Civil Judge & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 20/06/2016 |
| Order/Judgment uploaded on | : | 28/06/2016 |